



महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ✧ १४ एप्रिल २०२५ ✧वर्ष ६ ✧अंक २८६ ✧ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## पाण्याविना बळी जाणाऱ्या वन्यजिवांसाठी कृत्रिम पाणवठ्यांची गरज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील वनसंपदेवर ठेकेदारी कु-हाड फिरू लागल्याने आजच्या घडीला सर्वत्र वृक्षतोड सुरू आहे, जंगल तोडीला परवानगी असली तरी झाड तोडलेल्या जागेवर नविनझाड लावण्याचे आदेश जंगलतोड ठेकेदार व वनविभागाला देत असले तरी नविन झाड लावली जात नाहीत व आर्युवेदिक वनस्पतीजन्य झाड देखील तोडण्याचा सपाटा जंलतोड करणा-या ठेकेदारांनी कायम ठेवल्याने मिल्हे, दुधनोल, धसई,कळंभे परिसर मानगांव ,बंगालपाडा, इंदे, माजगाव ,देहरी ,सायले ,शिळघर, संगम ,कासगांव ,या ठिकाणी बेहिशोबी वृक्षतोड सुरू असुन जंगल व टेकड्या उजाड करून ठेवल्या जात आहेत,

तालुक्यात माळशेज घाट परिसर ते हरिचंद्रगड, भिंमाशंकर, कळसूबाई ,अभयारण्याच्या हद्दित शेकडो एकर जंगल पटटा येतो, नदिनाल्यावर पाण्याचा टिपुस नाही,जंगलात कृत्रीम पाणी पुरवठे बनविण्या साठी वनविभागाकडे निधी नाही,शासनाकडे या कृत्रिमपाणवठे बनविण्यासाठी वनविभाग मागणी करतेय परंतु शासन दखल घेत नसल्याची माहिती नाव व छापण्याच्या अटिवर वनकर्मचारीनी दिली,त्यातच जंगळतोडीला दखील वनविभागच जबाबदार असून त्यांच्याच संगममताने जंगळाच माळरान होऊ घातल्याने वन्यप्राण्याचे वस्तीवरील वाढते मानवी अक्रमणाने वन्यप्राणी देखील गावाकडे येऊ लागल्याने त्याच्या मागावर असलेले हिस्त्रप्राणी वाघ, बिबटे हे, गावकडे येऊन मनुष्या प्राण्यासाठी घातक ठरू लागले आहेत, गावोगावी माकडांच्या झूंडी हैदोस घालताना नागरिक त्रस्त होऊ लागले आहेत, निलगाईच्या झूंडी भेंडी काकडी भाजीपाला बागायती फस्त करू लागल्या आहेत,एकंदरीत बेकायदेशीर वृक्षतोडीला आळा बसत नसल्याने या अभयारण्यातील प्राणी पक्षी अन्ना पैक्षा पाण्याच्या शोधात मनुष्यवस्ती कडे धाव घेऊ लागले आहे,काही पाण्या अभावी तडफडून मरत आहेत, वनविभागाने या वन्यप्राण्यासाठी जंगलात कृत्रीम पानवठे बनविले तर किमान पाण्याअभावी हे अभागी जिव जाणार नाहीत, परंतु स्थानिक वनविभाग मागणी करते परंतु वरिष्टा कडून त्यांना निधी उपलब्ध होत नाही, याच वनविभागाकडून करोडो रुपयांचे वनबंधारे, मातीचे बंधारे, सिंमेट बंधारे, बांधण्या साठी दर साल निधी येतो या बांधलेल्या बंधा-यांत फक्त गाळसाचलेला असतो, तरीही बंधारे बांधण्याचे सत्र सुरुच असतं ,मात्र वन्यप्राण्यासाठी कृत्रीम पानवठ्यासाठी निधा मिळत नाही व जंगलतोडीला आळा बसत नसल्याने मनष्य व जंगली प्राण्यात खटके उडणे सुरू झाले आहे,





अन्न पाण्याच्या शोधात वन्यप्राणी माकडे, निलगाय, रानडूक्कर, हरिण सह वन्यप्राण्यानी गाववस्तीकडे घेतला आसरा

### निधी अभावी वनविभाग हातबळ

### अभयारण्यक्षेत्रासह सर्वत्र बेसुमार वृक्षतोडीने जंगलभुईसपाट

## जारचे पाणी आजार देत नाही ना?

### पाण्यात इथिलिन ग्लायकॉल द्रव पदार्थाचा होतो वापर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : जारचे पाणी स्वस्त व थंड मिळते, म्हणून दुकानात, कार्यालय, हॉटेल, लग्न कार्यालयांमध्ये याला मोठी मागणी असते. जार दिसला की, फिल्टरचे पाणी आणि शुद्ध पाणी समजून लोक पितात. परंतु, या पाण्याच्या दर्जाबाबत ग्राहकांकडून फारसा विचार केला जात नाही. त्यामुळे हे जारचे पाणी आजार तर देत नाही ना, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे उष्णतेच्या दिवसात थंड पाण्याची गरज भासते व मागणी देखील वाढते या पाण्याच्या शुद्धतेबाबत काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

छोट्या-मोठ्या कार्यक्रमांसह सार्वजनिक कार्यक्रमांत जारला विशेष मागणी असते. त्यामुळे शहरापासून ते गावखेडया पर्यंत जारच्या पाण्याची दुकाने मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. पण हे पाणी किती शुद्ध आहे याची कसलीच खात्री केली जात नाही.

नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणले जाणारे हे पाणी जिवाला धोका ठरत तर नाही ना याचा विचार कधी तरी कोणी तरी करायला हवा

काही ठिकाणी पाणी थंड करण्यासाठी इथिलिन ग्लायकॉल नावाचा घातक द्रव पदार्थ टाकून पाणी थंड करण्याची प्रक्रिया



केली जाते. यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होतो.

अन्न सुरक्षा कायद्यानुसार फक्त बाटली बंद पाण्याचा समावेश केला आहे. जारमधून विक्री होणारे पाणी हे पॅकेज ड्रिंकिंग वॉटरमध्ये येत नाही. त्याच्या तपासणीचे अधिकार कुणाला आहेत? पाण्याच्या शुद्धतेची जबाबदारी कोणाची ? जारमधील पाण्याच्या शुद्धतेवर कोणाचेही नियंत्रण नाही. परंतु, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून पाण्याची शुद्धता तपासणे महत्त्वाचे आहे, परंतु तसे होत नसल्याने हे पाणी पिणाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तालिक्याती बहुतांश आठवडा बाजार पेठेत लगतच्या गावात ह्या टेम्पोतुन जारच्या पाण्याची विक्री होते

जारमधून साध पाणी २० रू व थंडपाणी ३० प्रमाणे तेही स्वस्तात मिळत असल्याने त्याचा वापर वाढत आहे. जारद्वारे पाणी विक्रीचा व्यवसायही जोमात सुरू आहे. मेडिकल, दुकाने तसेच अनेक मोठ्या शॉप आणि मॉलमध्ये या पाण्याची विक्री होते.

होते परंतु हे जार कुठे व कसे भरले जातात ?या पाण्याच्या शुद्धते बाबत अन्नाप्रशासन विभाग बेदखल असल्याने नागरिकांच्या आरोग्याचं काय ?

### महामानवाची गौरव गाथा



डॉ बाबा साहेब! परदेशी गेले!
नाव कमविले! स्वदेशाचे।।1।।

उच्च त्यांचे ज्ञान! लिही संविधान!
कायदा सन्मान! शिकवला।।2।।

रुढी परंपरा! काही त्या अनिष्ट!
संम्पवण्या कष्ट! घेतलेत।।3।।

दीन दलितांचा! वाली भीमराव!
सर्व देत भाव! भारतात।।4।।

खोललं मंदिर! रुजव समता!
विश्वात बधुता! शिकवण।।5।।

हक्क मान स्त्रीला! त्यांनी सांगितला!
कायदा तो झाला ! या देशात।।6।।

मिटल्या त्या जाती! जनता हि भारी !
सारी अंगिकारी ! समानता ।।7।।

शिकेल टिकेल! संदेश रुजला!
पाया तो रचीला ! शिक्षणाचा।।8।।

गाथा ग्रन्थ खुप! साहित्य लिहलं!
ज्ञानातून दिलं! समाजाला।।9।।

प्रदीप मनोहर पाटील
गणपूर तालुका चोपडा
जिल्हा. जळगाव.
मो. 9922239055

## अखेर खातीवली उड्डाणपुलाचे काम सुरु

### सामाजिक कार्यकर्त्यांच्या आंदोलनाला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मुंबई - नाशिक महामार्गचे चौपादरीकरण झाल्यापासून चर्चेत असलेला खातीवली - वाशिंद चौफुलीवरील रखडलेल्या उड्डाणंपूलाला खातीवली, वासिंद गावातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला तब्बल आठ वर्षांनी यश आले आहे . महामार्ग प्रशासनाने खातीवली येथील चौफुलीवर उड्डाणंपुलाचे काम सुरु केल्याने येथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

शहापूर तालुक्यातील खातीवली ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या हायवे चौफुलीवर दररोज होणाऱ्या अपघातातून सुटका होण्यासाठी तेथे उड्डाणपूल बांधण्याच्या मागणीसाठी खातीवली ग्रामस्थ व उपसरपंच साईप्रसाद काबाडी यांच्या नेतृत्वाखाली नाशिक येथील महामार्ग प्रशासनातील अधिकाऱ्यांची तीन वर्षंपूर्वी भेट घेतली होती. त्याचवेळी सामाजिक कार्यकर्ते संजय सुरळके यांनी आमरण उपोषण देखील केलेले होते. खातीवली येथील शुभवस्तू गृहसंकुल येथील चौफुली जवळ उड्डाणपूल नसल्याने आतापर्यंत शेकडो अपघात झाले यामध्ये 12 नागरिकांचे प्राण गेले असून अनेक नागरिकांना कायमचे अपंगत्व आले आहे . विशेष म्हणजे तालुक्यातील सामान्य नागरिकांना याचा अधिक फटका बसला असून यातील बहुतांशी अपघात हे दुचाकीस्वार यांचे झालेले आहेत . भिवंडी येथील वडपे ते कसारा घाटातील घाटनदेवी मंदिरापर्यंतचा रस्ता हा खाजगी कंत्राटदाराच्या ताब्यात आहे.

खातीवली येथील शुभवस्तू गृहसंकुल येथील महामार्ग चौफुली वरील महत्त्वपूर्ण असलेला उड्डाणपूल सोडून ईतर सर्व कामे मागीलवर्षी सुरू झाली होती , मात्र महामार्ग प्रशासन व कंत्राटदाराकडून खातीवली उड्डाणपूलबाबत निरुत्साही धोरण असल्याने खातीवली माजी उपसरपंच साईप्रसाद काबाडी, ग्रामस्थ प्रशांत महाजन, एकनाथ तारमले, वाशिंद येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सुरळके यांनी अनेक वर्षांपासून महामार्ग प्रशासनासोबत पाठपुरावा चालूच ठेवला होता. आंदोलन, उपोषण, पत्र व्यवहार याद्वारे सुरु असलेल्या पाठपुराव्याला आता कुठे यश आल्याचे पुढे आले आहे. महामार्ग प्रशासनाने खातीवली - वाशिंद येथील चौफुलीवर उड्डाणंपुल बांधण्याचा शुभारंभ केला असून वेळेत काम पूर्ण झाले तर महामार्गांवर होणाऱ्या अपघातातून जाणाऱ्या सामान्य माणसांचे मृत्यू थांबण्यास मदत होणार असून येथील जनतेची गैरसोय दूर होईल.



'येथे वारंवार अपघात होत होते ,त्यासाठी येथे उड्डाणपूल व्हावा यासाठी अनेकवेळा उपोषण,रस्ता रोको व मोर्चे काढून तिव्र आंदोलन केले होते त्यामुळे संबंधित प्रशासनाने दखल घेत येथे उड्डाण पूल मंजूर केला असून त्याचे काम सुद्धा सुरू केल्याने येथील नागरिकांची गैरसोय दूर होणार असून अपघातात नाहक बळी जाणार नाही.'
– संजय सुरळके, सामाजिक कार्यकर्ते, वासिंद.

## संविधान उद्यान लोकार्पण सोहळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर: बदलापुरातील हेंद्रेपाडा येथे उभारण्यात आलेल्या संविधान उद्यानाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून लोकार्पण करण्यात येणार आहे. सोमवारी (ता.१४) संध्याकाळी ५ वा. आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते या उद्यानाचे लोकार्पण केले जाणार असून कुळगाव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे यांच्या संकल्पनेतून कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या माध्यमातून या उद्यानाची उभारणी करण्यात आली आहे.

## बांगलादेशींना कसे मिळतात आधार कार्ड ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : अभिनेता सैफ अली खान याच्यावर मुंबईतील घरात एका बांगलादेशीने हल्ला केल्याची घटना अलीकडेच घडली. त्यानंतर बांगलादेशींवरील कारवाई मुंबई आणि ठाण्यात तीव्र झाली. कारवाईची धार अलीकडेच तीव्र झाली असली तरी गेल्या दहा वर्षांत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात तब्बल ५०९ बांगलादेशींवर कारवाई झाली.

ठाण्यातील अनेक बांधकामांच्या ठिकाणी



बांगलादेशी पुरुष मजूर म्हणून काम करतात, तर महिला बारमध्ये गायक किंवा वेट्रेस म्हणून काम करतात. काही महिलांनी घर चालविण्यासाठी देहविक्रीचा व्यवसाय पत्करल्याची माहिती पोलीस चौकशीत उघड झाली आहे. महाराष्ट्रात सैफ अली हल्ल्यासारखे आणखी काही धक्कादायक प्रकार निदर्शनास आले. अनेक बांगलादेशी हे गुन्हेगारी प्रवृत्तीचेही असल्याची बाब पाहण्यात आली. तुलनेत हे मजूर स्वस्त, कुशल तसेच अंगमेहनती असल्यानेही त्यांना कामावर ठेवण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांमध्ये चढाओढ लागते. ठाण्याचे खा. नरेश म्हस्के आणि भाजपचे नेते किरीट सोमय्या यांच्या मागणीनंतर केंद्र सरकारने या बांगलादेशींविरुद्धची मोहीम तीव्र केली.

असा शिरकाव... मेघालय, पश्चिम बंगाल यांच्या सीमेवरील चेक पोस्ट चुकवून ते घुसखोरी करतात. बनावट कागदपत्रांच्या आधारे आधारकार्ड बनवितात. त्यानंतर ते कोलकातामार्गे मुंबई, ठाणे आणि पुणे गाठतात.

कारवाई तीव्र : दहा वर्षातच पोलिसांनी कारवाई केलेल्या बांगलादेशी घुसखोरींची संख्या ५०९ इतकी आहे. सैफ अलीच्या प्रकरणानंतर ठाण्यात बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध कारवाई तीव्र केली. ४३ गुन्हे दाखल झाले असून ८६ जणांना अटक करण्यात आली आहे.



मुरबाड तालुक्यात अवकाळी पावसाने झोडपले तालुक्यातील टोकावडे, सरळगाव परिसरात वादळी वाऱ्यांसह पावसाने हजेरी लावली. अवकाळी पावसामुळे शेती सह भाजीपाला पिकाचे नुकसान झाले आहे.

### कल्याण पूर्वेतील अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरण

## आरोपी विशाल गवळीची आत्महत्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेत राहणाऱ्या अल्पवयीन 13वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या नराधम आरोपी विशाल गवळी याने आज तळोजा कारागृहात आत्महत्या केली आहे. त्यावेळी या क्रूर घटनेत या आरोपीला अटक करण्यात आली तेव्हा सर्वच स्तरातून फाशीची शिक्षा त्याला द्यावी अशी मागणी होत होती.



आज त्याच्या आत्महतेच्या घटनेने नैसर्गिक न्याय झाल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत.

### शहापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा...

## देसले सरांची 'चंदेरी दुनिया' शालेय ग्रंथालयात...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : समग्र शिक्षा ग्रंथालय उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यातील एक उपक्रमशील शिक्षक,कवी, लेखक व महाराष्ट्र राज्य शासनाने गौरवलेल्या विजयकुमार देसले सर यांच्या 'चंदेरी दुनिया' ह्या बालकविता संग्रहाची राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद यांच्या माध्यमातून शासनाकडून निवड करण्यात आली आहे.चंदेरी दुनिया हा बालकविता संग्रह इयत्ता १ ली ते ३ री या वयोगटासाठी निवडला असून यामध्ये एकूण १२ कवितांचा समावेश आहे.सर्वच कविता ह्या बालमनाला भावणाऱ्या आहेत. कवी विजयकुमार देसले यांचे चिरंजीव तन्मय देसले यांनी या कविता संग्रहात असणाऱ्या प्रत्येक कवितेसाठी अप्रतिम चित्र साकारले आहे.

विजयकुमार देसले यांचे हे आतापर्यंतचे चौदावे पुस्तक आहे.या अगोदर मधुराणी बी.एड् अभ्यास मालेच्या नऊ पुस्तकांचे लेखन त्यांच्याकडून झालेले आहे. १४ मार्च २०१५ रोजी 'गंमतगाणी' हा बाल कवितासंग्रह प्रकाशित करुन त्यांनी बालमनाला आनंद दिला आहे. ३१ जानेवारी २०१८ रोजी विचारमंथन तर २७ फेब्रुवारी २०२१ रोजी पाऊलखुणा तसेच १ मार्च २०२५ रोजी 'गंध फुलांचा' कवितासंग्रहाची निर्मिती त्यांच्याकडून झालेली आहे.

शासनाकडून या बाल कविता संग्रहाची निवड झाल्याने जिल्हा शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था रहाटोलीचे प्राचार्य डॉ.संजय वाघ,अधिव्याख्याता डॉ.दिनेश चौधरी,शहापूरचे गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण,शिक्षण विस्तार अधिकारी हिराजी वेखंडे, पांडुरंग महाळूंगे, रोहिणी क्षीरसागर, केंद्रप्रमुख प्रभाकर जाधव यांसह इतर अधिकारी वर्ग तसेच शिक्षक परिवाराने विजयकुमार देसले यांच्या कार्याचे कौतुक केले. महाराष्ट्रातील प्रत्येक प्राथमिक शाळेत हा कविता संग्रह उपलब्ध होणार असल्याने विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

समग्र शिक्षा सन २०२४-२५ अंतर्गत ग्रंथालय पुस्तक निर्मिती उपक्रमांतर्गत ठाणे जिल्हास्तरीय पुस्तक परीक्षण समिती आणि राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण,निवड व संपादन मंडळ समिती यांचेमार्फत परीक्षण होऊन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र पुणे (SCERT)यांच्या माध्यमातून शहापूर तालुक्यातील उपक्रमशील शिक्षक विजयकुमार देसले यांचा 'चंदेरी दुनिया' हा बाल कवितासंग्रह महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेच्या वाचनालयात पोहोचणार याचा मनस्वी आनंद आहे. शहापूर शिक्षण विभागासाठी ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे.
– भाऊसाहेब चव्हाण,गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती शहापूर.

### बाल साहित्यातून होतो भावनिक व मानसिक विकास

बाल कवितांमध्ये मुलांच्या भावना, अनुभव आणि जगण्याची दृष्टी व्यक्त केली जाते.बाल कविता संग्रह हा बालसाहित्याचा एक महत्त्वाचा भाग आहे.जो मुलांच्या मानसिक आणि भावनिक विकासाला मदत करतो. तसेच मुलांसाठी शिक्षण आणि मनोरंजनाचे ते एक साधन आहे. त्यातून मुलांना नवीन गोष्टी शिकायला मिळतात आणि त्यांना आनंद देखील मिळतो.यामध्ये निसर्गरम्य कविता, प्राणी आणि पक्षी यांच्याबद्दलच्या कविता, कथा, मजेदार आणि विनोदी कविता, तसेच शैक्षणिक कविता यांचा समावेश असतो.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता



विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी "आम्ही शासनकर्ती जमात बनणार" या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, "या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते."

पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## गीतासार



### अध्याय ७
### ज्ञानविज्ञानयोगः

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति । तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ७-२१ ॥

जो जो सकाम भक्त ज्या ज्या देवतास्वरूपाचे श्रद्धेने पूजन करू इच्छितो, त्या त्या भक्ताची त्याच देवतेवरील श्रद्धा मी दृढ करतो. ॥ ७-२१ ॥

स तया श्रद्धया युक्त स्तस्याराधनमीहते । लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ॥ ७-२२ ॥

तो त्या श्रद्धेने युक्त होऊन त्या देवतेचे पूजन करतो आणि त्या देवतेकडून मीच ठरविलेले ते इच्छित भोग निश्चितपणे मिळवितो. ॥ ७-२२ ॥

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् । देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥ ७-२३ ॥

पण त्या मंदबुद्धी लोकांचे ते फळ नाशिवंत असते. तसेच देवतांची पूजा करणारे देवतांना प्राप्त होतात आणि माझे भक्त, मला कसेही भजोत, अंती मलाच येऊन मिळतात. ॥ ७-२३ ॥

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः । परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ ७-२४ ॥

मूढ लोक माझ्या सर्वश्रेष्ठ, अविनाशी अशा परम भावाला न जाणता मन-इंद्रियांच्या पलीकडे असणाऱ्या, सच्चिदानंदघन परमात्मस्वरूप मला मनुष्याप्रमाणे जन्म घेऊन प्रगट झालेला मानतात. ॥ ७-२४ ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः । मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ ७-२५ ॥

आपल्या योगमायेने लपलेला मी सर्वांना प्रत्यक्ष दिसत नाही. म्हणून हे अज्ञानी लोक जन्म नसलेल्या आणि अविनाशी मला परमेश्वराला जाणत नाहीत. अर्थात मी जन्मणारा-मरणारा आहे, असे समजतात. ॥ ७-२५ ॥

## भीम स्मारक



बाबासाहेबांचे भव्य
मना मनात स्मारक
बदलून गेले आयुष्य
ते मुर्तीमंत उध्दारक

सद् विचारांचान्यास
बनविले अभ्यासक
पायाअसता भक्कम
जीवन हो विश्वासक

मुखकमल तेजाळले
चरित्र हो मनमोहक
संघर्ष कराया सज्ज
परिस्थिती ती दाहक

असे असावे स्मारक
नाही विवाद नाहक
बाबा गुणांचाखजिना
संतृप्त संतुष्ट ग्राहक

हृदयाचीजागा माझी
तेच रे संपूर्ण मालक
लेकरे निळयासूर्याची
तेजचं आमचे पालक

स्मारकाची रूंदीउंची
भलती आश्चर्यकारक
भीम विचाराशी जोडे
रे अंतर्मनातले दोरक

उपकार फिटणार ना
अपुरे आपले जीवक
भिमराव पूर्ण विश्वाचे
का भांडतो मी नाहक

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## कांदळवन वृक्षतोड प्रकरणात गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दिवा पश्चिमेकडील देसाई खाडीपट्ट्यात भूमाफियांनी बेकायदा खारफुटींची कत्तल करून भराव केल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला. त्यानुषंगाने ग्राम महसूल अधिकारी, दिवा यांनी मुंब्रा मंडळ अधिकारी यांच्या समवेत दि.20 मार्च 2025 रोजी मौजे दिवा येथील उग्रेश्वर मंदिराजवळ गणेश घाट या खाडीलगत भागाची समक्ष स्थळ पाहणी केली.

या पाहणी प्रसंगी, ही जमीन खाडीलगत असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मातीचा भरावा केल्याचे दिसून आले. याविषयी स्थानिक चौकशी केली असता हा भराव प्रदीप पाटील नामक व्यक्ती करीत असल्याचे समजले. तेथील समक्ष स्थळ पाहणी करून प्रदीप पाटील या व्यक्ती विरोधात कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 व 17 अन्वये शासनाच्या वतीने मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती प्रांताधिकारी उर्मिला पाटील व तहसिलदार उमेश पाटील यांनी दिली आहे. तसेच सिडकोच्या मालकीची नेरूळ, सीवूड्स प्लॉट नं. ३, ६, ७ सेक्टर 52ए येथील जागा भूखंड वाटपाद्वारे मेयर्स टूडे रॉयल डेव्हलपर्स यांना देण्यात आली होती. या जागी त्यांच्यामार्फत जेसीबीच्या सहाय्याने विविध प्रकारची 100 झाडे मुळासकट तोडण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. तसेच ही झाडे तोडण्याकरिता सिडकोकडून कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आली नसल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

या भूखंडावर अनधिकृतपणे झालेल्या वृक्षतोडी विरोधात नवी मुंबई महापालिकेमार्फत येथे जाऊन दोन जेसीबी ताब्यात घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यानुषंगाने या जमिनीवरील कांदळवन बफरझोन क्षेत्रामध्ये अवैधरीत्या वृक्षतोड केल्याप्रकरणी संबंधित विकासक/ठेकेदार यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा 1986 मधील कलम 15 (1) अन्वये एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती प्रांताधिकारी उर्मिला पाटील व तहसिलदार उमेश पाटील यांनी दिली आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण

विश्वरत्न महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या १३४ वी जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादनन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दीन दलीत, उपेक्षित, वंचित वर्गासाठी, महिलांच्या कल्याणासाठी घालवले. या वर्गासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते सर्वांनाच माहीत आहे मात्र डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य हे इतपतच मर्यादित नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा, मानववंश शास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. मात्र डॉ बाबासाहेब आबेडकरांनी देशाच्या अर्थशास्त्रात आणि जल धोरणात महत्वाची भूमिका बजावली हे खूप कमी लोकांना माहीत आहे. आज महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दर दोन वर्षांनी राज्यावर दुष्काळाची गडद छाया पसरते या वर्षीही राज्यावर किंबहूना देशावर दुष्काळाचे सावट आहे अशावेळी बाबासाहेबांच्या जलधोरणाची आणि त्याच्या अमंबजावणीची किती गरज आहे याची प्रकर्षाने जाणीव होते. देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या देशात जो पाऊस पडतो तो ठराविक कालावधीत म्हणजेच मोसमात पडतो. जून ते सप्टेंबर हा आपल्याकडे पावसाचा मोसम समजला जातो कारण याच चार महिन्यात आपल्याकडे पाऊस पडतो म्हणून त्याला मोसमी पाऊस म्हणतात. या चार महिने पडणाऱ्या पावसावरच आपली शेती अवलंबून आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे जर या चार महिन्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याचा परिणाम आपल्या शेतीवर पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशात सर्वत्र सारखाच पाऊस पडतो असे नाही काही भागात धो धो पाऊस कोसळतो तर काही भागात पाऊसच पडत नाही. पावसाच्या विषम प्रमाणामुळे देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य तर काही भागात अती पाऊस झाल्याने पूर जन्य परिस्थिती असे चित्र दिसते. पावसाच्या या लहरिपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. निसर्गावर आपले नियंत्रण नाही मात्र पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करून या संकटावर मात करता येऊ शकते हे बाबासाहेबांनी जाणले होते. २० जुलै १९४२ रोजी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि वीज हे विभाग सोपवण्यात आले. दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक विकासाचे धोरण सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. १९३५ च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन व वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरले.

१) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे



२) राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत ऊर्जा संपत्ती निश्चित करणे

३) शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय धोरण काय असावे ? या गोष्टींचा समावेश होता.

घटना तयार करतानाही बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून ठेवल्या.


बाबासाहेबांनी घटनेचा आराखडा घटना समितीस सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अख्त्यारीत असावा अशी भूमिका मांडली. बाबासाहेबांनी घटनेत पाणी हा विषय क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत केला त्यामुळे केंद्र शासनाला पाण्यासंबंधी कायदा करण्याचे अधिकार मिळाले. भारताच्या राज्यघटनेत ही तरतूद कलम २६२ मध्ये समाविष्ट करण्यात आली. याच तरतुदी अंतर्गत आंतरराज्य जलविवाद कायदा नदिखोर प्राधिकरण कायदा १९५६ पारित करण्यात आला.

नोव्हेंबर १९४५ मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत बाबासाहेबांनी अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. पाणी आणि महापूर विनाशकारी आहे असे गृहीत धरून सुचवू नका. देशामध्ये एवढे पाणी उपलब्धच नाही की जे हानिकारक ठरू शकेल. भारतीय जनतेला पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात. जास्त पाण्याच्या उपलब्धेमुळे नाही. पाणी राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पावसाळ्यात पडणाऱ्या असमतोल पावसामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे. त्यामुळे जिथे पुरामुळे नुकसान होत असते त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी समुद्राला जाऊ न देता विकासा साठी वापरणे इष्ट ठरेल असे विचार बाबासाहेबांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या या विचाराने प्रभावित होऊन केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदिवरील बहुउद्देशीय विकास प्रस्तावावर बाबासाहेबांशी चर्चा करून हिराकुड धरणाची अमंबजावणी केली.

कटक येथील पाणी परिषदेत बाबासाहेबांनी मांडलेल्या विचारांची अमंबजावणी झाली असती तर आज पडणारा दुष्काळ पडला नसता. आज नदी जोड प्रकल्पाची जी संकल्पना मांडली जात आहे ती संकल्पना मूळची बाबासाहेबांचीच होती हे खूप कमी लोकांना माहीत आहे. ज्या समाजाला हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्याच समाजातील बाबासाहेबांनी देशवासीयांना मुबलक पाणी व वीज मिळावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इतका सखोल विचार कुणी केला नाही आणि दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने देशाचे हितचिंतक ठरतात.

- श्याम ठाणेदार

## रेसिपी
## चिंच गुळाची आमटी



साहित्य

तुरीची डाळ - 1 वाटी,गुळ - 2 चमचे,चिंचेचा कोळ - 2 चमचे,लाल तिखट - गरजेनुसार,गोडा मसाला - 1 चमचा, कोथिंबीर, कडीपत्त्याची पाने - 7 ते 8, ओलं खोबऱ्याचा किस - 1 चमचा , मोहरी , जिरं, हिंग, हळद तेल, मीठ

कृती


सर्वात आधी तुरीची डाळ 5 ते 6 तास भिजत घाला.
कुकरमध्ये चिमूटभर हळद टाकून तुरीची डाळ शिजवून घ्यावी.
शिजलेली तुरीची डाळ एका कढईत काढा आणि कढई गॅसवर ठेवा.
या डाळीत तुम्हाला जेवढी आमटी हवी आहे, तेवढं पाणी टाका.
यानंतर डाळीत लाल तिखट, गोडा मसाला. खोबऱ्याचा किस, चिंचेचा कोळ, गुळाचा खडा आणि चवीनुसार मीठ घाला.
आमटीला चांगली उकळी येऊ द्या.
आमटीला उकळी येईपर्यत फोडणीपात्रात हिंग, हळद, लाल तिखट, कडीपत्त्याची पाने घालून खमंग फोडणी तयार करा.
तयार फोडणी आमटीत घाला.
सर्वात शेवटी चिरलेली कोथिंबीर आमटीत घाला आणि पुन्हा एक उकळी आणा.
तुमची झटपट तयार होणारी चटकदार चिंचगुळाची आमटी तयार झाली आहे.

### समाज कल्याण कार्यालयामार्फत
## रक्तदान शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त व "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह"च्या अनुषंगाने आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सुरू झालेल्या सामाजिक समता सप्ताहाचे हे दहावे वर्ष असून सालाबादप्रमाणे सामाजिक समता सप्ताहास उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला असून आज आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

यावेळी सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे यांनी तसेच समाज कल्याण निरिक्षक अभिजित शिंदे व कार्यालयातील इतर कर्मचारी आणि परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला. या रक्तदान शिबिरासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्पालयाचे अधिष्ठाता राकेश बरोट, रुग्णालयाचे रक्तदान विभागाचे श्री.कासार व श्री.कोरी यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व रक्तदात्यांचे सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे यांनी आभार व्यक्त केले.

## 'शिवपुत्र संभाजी' महानाट्याचे शहापुरात आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील वासिंद किंवा आसनगांव मुंबई-नाशिक महामार्गालगत प्रथमच शिवपुत्र संभाजी महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या होणाऱ्या महानाट्य बाबत अभिनेते आणि खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी वासिंद खातिवली येथील हॉटेल धिंग्रा येथे पत्रकार परिषद घेऊन सदरची माहिती दिली.

ठाणे जिल्ह्यात प्रथमच शिवगर्भसंस्कार भूमी असलेल्या शहापूर तालुक्यात या युगंधरा क्रिएशन आयोजित, जगदंब क्रिएशन प्रस्तुत, डॉ.अमोल कोल्हे अभिनित आणि महेंद्र महाडिक लिखित- दिग्दर्शित या 'शिवपुत्र संभाजी' महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक 14 ते 19 मे 2025 असे एकूण 6 दिवस हे महानाट्य चालणार आहे. सदर, या महानाट्यातून कला सादर करणे नाहीतर हा इतिहास पुढे पर्यंत विवेकशील, विवेकबुद्धीने पोहचविणे फार गरजेचे आहे. कारण इतिहास जितकं मांडत राहु तितका कमी आहे त्याच्या पासून आजच्या काळातील जी प्रेरणा आहे ती कायम मिळत राहते हा माझा प्रयत्न आहे असे कोल्हे यांनी म्हटले आहे. तर या महानाट्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याने ऐनवेळी एकदोन प्रयोग वाढवावे लागत असून ठाणे जिल्ह्यातील सर्व शिवशंभू प्रेमीकडूनही अपेक्षा आहे की, या प्रयोग महानाट्याला प्रतिसाद देतील असे डॉ.अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ. कल्पेश तारमळे, निशिकांत शेलार, काशिनाथ तिवरे आदीजण उपस्थित होते.

### खाजगी आश्रम शाळेत
## दोन अल्पवयीन मुलींची लैगिक छेडछाड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशन च्या हद्दीतील खडवली येथे खाजगी आश्रम शाळेतील दोन अल्पवयीन मुलीची लैंगिक छेडछाड ,तसेच मुलांना मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हा बाल कल्याण समिती सदस्य च्या पाहणी दरम्यान उजेडात आला आहे.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार खडवली येथील खाजगी पसायदान आश्रम शाळेत निराधार, गोर,गरीब,सुमारे 29 विघार्थी शिक्षण घेत असून शाळेतील विघार्थीच्या बाबत चाँईल्ड लाईन मार्फत तक्रार प्राप्त झाल्याने ठाणे जिल्हा महिला बाल कल्याण समिती सदस्य या शाळेत गेले असता मुला मुलींना विश्वावासात घेतले. असता. धक्कादायक प्रकार उजेडात आला. दोन अल्पवयीन मुलीची लैंगिक छेडछाड तसेच मुलांना मारहाण होत असल्याचे पुढे आल्याने सदस्य व्यथित झाले. या प्रकरणाची दखल घेत या प्रकरणी टिटवाळा पोलीस स्टेशनमध्ये शाळेचा संचालक बबन शिंदे त्यांची पत्नी, आशा शिंदे, मुलगा प्रसन्न शिंदे ,शिक्षिका दर्शना पंडित कर्मचारी प्रकाश गुप्ता असा पाच जणावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी संदर्भीत पाच आरोपीना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून शाळेतील मुला मुलींना उल्हासनगर येथील बाल सुधार गुहात पाठविले असून या गुन्ह्याप्रकरणी अधीक तपास टिटवाळा पोलीस करीत आहेत.

### पारमिता धर्मादाय न्यास कल्याण तर्फे
## शालोपयोगी साहित्याचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पारमिता धर्मादाय न्यास कल्याण (पश्चिम) यांच्या तर्फे इंदौर (मध्य प्रदेश) येथील श्री वामा शीशु विहार शाळेतील जवळपास 60 विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे न्यासाचे अध्यक्ष बालकदास मेश्राम, सचिव मधुसूदन राऊत, खजिनदार अनिल मेश्राम, विश्वस्त गंगाधर मेश्राम, मुकुंद अंबादे, विश्वनाथ जांभुळकर यांच्याकडून मोफत वाटप करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता दिक्षित, व्यवस्थापक माधुरी मोयडे आणि शिक्षक वर्ग कार्यक्रमास उपस्थित होते.




पारमिता धर्मादाय न्यास कल्याण तर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालोपयोगी साहित्याचे वाटप केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका आणि व्यवस्थापक यांनी तसेच विद्यार्थ्यांनी न्यासाच्या सर्व विश्वस्तांचे आभार मानले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# भातसा व घोरपडी पुल प्रवासासाठी धोकादायक

## नागरिक जीव मुठीत घेऊन करतात प्रवास



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापुर-किन्हवली मार्गावरील सापगाव जवळील भातसा नदीवरील पुलाचे कठडे तुटले आहेत तर गोठेघर गावहद्दीतील घोरपडी नदीवरील पुल जीर्ण झाल्याने वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. या मार्गावरुन कर्जत, मुरबाड, अहमदनगर,जे. एन.पीटी या सारख्या औद्योगिक वसाहतीमध्ये अवजड वाहनांसह शहापूर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दररोज हजारो प्रवासी या-ना त्या वाहनाने प्रवास करत असतात. या दोन्ही पुलांची अवस्था बिकट झाली असून याठिकाणी कधीही मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घोरपडी नदीवरील पुल ब्रिटिशकालीन असुन जीर्ण व कमकुवत झाला आहे. पुल अंरूद असुन पुलाच्या दोन्ही बाजूस संरक्षण कठडे नसल्यामुळे इथे सतत ट्रॉफिक होत असते. मागील तीन महिन्यापूर्वी एक रिक्षा प्रवासी घेऊन पुलाच्या खाली कोसळली होती.सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडून जीवीतहाणी झाली नाही. अशा अनेक छोट्या-मोठ्या घटना येथे घडत असतात. तर सापगांव जवळील भातसा नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे पडले असतांना सुद्धा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असुन सावित्री पुलासारखी एखादी मोठी दुर्घटना होण्याची वाट पाहत आहेत का अशी चर्चा प्रवाशी व वाहनचालक करत आहेत. दरम्यान याबाबत संबधित एम.एस.आर.डी सी.चे श्री. शेख यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# धर्मसेवक डॉ.सोन्या पाटील यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' पुरस्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी धर्मपीठ यांच्या वतीने ठाकरे गट शिवसेनेचे ठाणे उपजिल्हाप्रमुख व धर्मसेवक डॉक्टर सोन्या काशिनाथ पाटील यांना यावर्षीचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'या राष्ट्रीय पुरस्काराने मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात तेलगणाचे राज्यपाल विष्णू देव वर्मा यांच्या हस्ते गौरविण्यात आले यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान दिल्याबद्दल डॉ.सोन्या पाटील यांना " पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर राष्ट्रीय सामाजिक पुरस्कार 2024" ने गौरवण्यात आले. या पुरस्काराचे उद्दिष्ट समाजातील निस्वार्थ कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहन देणे त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि प्रेरणादायी कार्याची समाजासमोर उजळणी करणे हे आहे. या सोहळयात विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवर, समाजसेवक, प्रशासकीय अधिकारी यांचाही सत्कार करण्यात आला.

हा सत्कार सन्मानाचा नव्हे तर समाजाच्या उन्नतीत्या मार्गदर्शक ठरणारा असून यापुढेही समाजसेवेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला व समाजाला मदत करण्याचे कार्य अविरत सुरूच ठेवणार असल्याचे यावेळी सोन्या पाटील यांनी सांगितले. धर्म सेवक सोन्या पाटील यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ठाकरे गट शिवसेनेचे प्रवक्ते-खासदार संजय राऊत,आमदार भास्करराव जाधव,आमदार सुनील प्रभू ,जिल्हाप्रमुख पाटील कुंदन,जिल्हा संपर्क प्रमुख साईनाथ तारे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

# मांडा-वासुंद्री पुलाला स्वर्गीय वसंतराव केणे सरांचे नाव द्या - ग्रामस्थांची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : भा ज पा चे जेष्ठ कार्यकर्ते टिटवाळा परिसरातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अग्रगण्य असलेले स्वर्गीय वसंतराव पांडुरंग केणे यांचे दिनांक 30/03/2025 रोजी अल्पशा आजाराने वयाच्या 78 व्या वर्षी निधन झाले . यावेळी त्यांना त्यांच्या कार्याबद्दल अभिवादन करण्यासाठी मांडा टिटवाळयातील ग्रामस्थांनी शोकसभेचे आयोजन केले होते. या शोकसभेत ठाणे जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते सन्माननीय माजी मंत्री जगन्नाथ पाटील व मुरबाड मतदार संघाचे आमदार माननीय किसन कथोरे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य जयराम मेहेर बामसेफ संघटनेचे मा.श्री सुरेश दादा पाटील ठाणे जिल्हा बँकेचे माजी उपव्यवस्थापक अनंत शिसवे साहेब, जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष माननीय रविंद्र घोडविंदे सर कल्याण डोंबिवली महापालिका माजी उपमहापौर उपेक्षाताई भोईर, माजी पंचायत समिती सदस्य गिरीष म्हात्रे साहेब, सांगोडे कोंढेरी ग्रामपंचायत सरपंच , वासुंद्री ग्रामपंचायत सरपंच वारकरी संप्रदायाचे वारकरी संप्रदायाचे ह भ प दशरथ महाराज केणे असे अनेक सर्व पक्षीय व सामाजिक काम करणारे अनेक मान्यवर व ग्रामस्थ या शोकसभेत उपस्थित होते. प्रत्येकाने स्वर्गीय वसंतराव केणे सर यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. व त्यांच्या संघर्षातून निर्माण झालेला वासुंद्री मांडा पुलाबद्दल अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणात त्याच्या संघर्षाचा उल्लेख केला. व ह्या पुलास स्वर्गीय वसंतराव केणे सर असे नामकरण करावे व हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल असे सर्व मान्यवरांनी व मांडा टिटवाळा परिसरातील वासुंद्री कोंढेरी मांडा सांगोडे या ग्रामस्थांनी आव्हान केले त्यास मुरबाड मतदार संघाचे सन्माननीय आमदार किसन कथोरे साहेब यांनी ह्या पुलास स्वर्गीय वसंतराव केणे पुल असे नामकरण करण्यास निश्चितच मी प्रयत्न करेन असे सर्व ग्रामस्थांना श्रद्धांजली वाहताना संबोधित केले.

# शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय भोईरवाडी येथे करण्यात आले होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, माँसाहेब मिनाताई ठाकरे, धमैवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य शिबीरास सुरुवात करण्यात आली.

आरोग्य शिबीरात विविध आजाराची मोफत तपासणी करण्यात आली, तसेच नेत्रतपासणी हि करण्यात आली. परिसरातील असंख्य नागरिकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घेतला.

आरोग्य शिबीर यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी युवा सेनेचे अनिरुद्ध पाटील, योगेश पाटील,राम मुसळे,सुनील वाघ, शिवसेना विभागीय शाखा बिर्ला कॉलेज यांनी मेहनत घेतली.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ
# नवी मुंबई अध्यक्ष पदी राजेंद्र बोडके यांची निवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या १० ते १२ वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून आपल्या निःस्वार्थ आणि परखड कार्यशैलीमुळे समाजमनावर आपला ठसा उमटवणारे एक सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या राजेंद्र बोडके यांनी जनतेच्या प्रश्नांना शासन-प्रशासनाच्या दरबारात पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य जे समर्पणाने केले, त्याचा परिणाम म्हणून आज हजारो सामान्य नागरिक त्यांना आपला विश्वासू प्रतिनिधी मानतात.

त्यांच्या पत्रकारितेतील निस्वार्थ कार्य, निर्भीडतेने प्रश्न मांडण्याची शैली आणि जनतेसाठी त्यांनी केलेले उल्लेखनीय योगदान पाहता, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंढे आणि प्रदेश संघटक नितीन शिंदे यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना नवी मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. हे केवळ एक पद नाही, तर त्यांच्या कार्याला मिळालेला मोठा सन्मान आहे.

या निवडीबद्दल नवी मुंबईतील अनेक प्रशासकीय अधिकारी, शासकीय कर्मचारी आणि पत्रकार बंधूंनी त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या मनोगतात राजेंद्र बोडके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "पत्रकारिता करताना अनेक आव्हाने येतात, शासन आणि प्रशासनाचा दबावही अनेकदा सहन करावा लागतो. पण अशा कठीण प्रसंगी पत्रकार एकटे पडू नयेत, म्हणूनच मी संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांना पाठबळ देण्याचे कार्य करणार आहे. अन्याय झालेल्या पत्रकारांसाठी मी नेहमी उभा राहीन आणि त्यांच्या आवाजाला वाचा फोडण्याचे काम करीन."

ते पुढे म्हणाले, "पत्रकारांचे प्रश्न मार्गी लागावेत, त्यांच्या हक्कांसाठी आवाज बुलंद व्हावा आणि पत्रकारितेचा खरा हेतू – म्हणजे लोकशाहीची चौथी स्तंभ म्हणून भूमिका बजावणं – हे जपण्यासाठी मी निस्वार्थ भावनेने काम करणार आहे."

संघटनेचे प्रदेश संघटक नितीन शिंदे यांनीही आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, "राजेंद्र बोडके हे एक अभ्यासू, कर्तबगार आणि नितळ मनाचे व्यक्तिमत्त्व आहे. ते केवळ पत्रकार नाहीत, तर पत्रकारांच्या समस्यांवर उपाय शोधणारे नेतृत्वही आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे नवी मुंबईतील पत्रकारांना केवळ न्यायच मिळणार नाही, तर संघटनेची ताकदही वाढणार आहे."

कोकण विभागीय संघटक अरुण बिराजदार यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, "राजेंद्र बोडके यांचे कार्य मी स्वतः जवळून पाहिले आहे. ते प्रसंगी लढवय्ये असतात, प्रसंगी समंजस. त्यांनी नवी मुंबईतील पत्रकारितेला जी दिशा दिली आहे, ती खरोखर अविस्मरणीय आहे. म्हणूनच ही जबाबदारी त्यांनी पूर्ण ताकदीने पार पाडतील, याची मला पूर्ण खात्री आहे."

जनतेचा सावधान महाराष्ट्र वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक पुंडलिक काणगुडे यांनी सांगितले की, "राजेंद्र बोडके हे लढाऊ स्वभावाचे, प्रामाणिक आणि स्वच्छ नजरेने समाजाकडे पाहणारे पत्रकार आहेत. कोणताही राजकीय वा वैयक्तिक स्वार्थ न ठेवता त्यांनी नेहमीच सामान्य माणसांच्या बाजूने उभं राहत पत्रकारितेचं खरं स्वरूप टिकवून ठेवलं आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे नवी मुंबईतील पत्रकारांना एक प्रेरणादायी मार्गदर्शक मिळाला आहे, याचा आम्हाला अभिमान आहे."

*या सगळया गौरवाच्या पार्श्वभूमीवर, राजेंद्र बोडके हे केवळ एक पत्रकार नाहीत, तर पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला दिशा देणारे एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या या नव्या प्रवासासाठी अनेकांच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद त्यांच्यासोबत आहेत.*

# मुरबाड पुरवठा विभागाकडून अपात्र शिधापत्रिकांची तपासणी मोहीम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम 2013 ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. यानुसार अन्न नागरी पुरवठा विभागातील निर्देशानुसार व ठाणे जिल्हा पुरवठा व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने शहापूर तहसिलदार परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सुर्यवंशी यांच्या देखरेखीखाली तहसिल विभागातील पुरवठा शाखेकडून अपात्र शिधापत्रिका तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

तालुक्यातील अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी (केशरी) व शुभ्र या सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करण्यासाठी दरवर्षी 1 एप्रिल ते 31 मे या कालावधीमध्ये शोध मोहीम राबविण्यात येत आहे. सदर, शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांतर्गत या शोध मोहीमेत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थांच्या शिधापत्रिकां धारकांकडून रास्त भाव धान्य दुकानदार यांच्या माध्यमातून विविध नमुन्यात तपासणी अर्ज भरून प्राप्त केले जात असल्याची माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सुर्यवंशी यांनी दिली आहे.

दरम्यान, गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळणे करिता सधन लाभार्थांनी अन्न सुरक्षा योजनेनेतून बाहेर पडून शासनाच्या मोहिमेस सहकार्य करावे असे आवाहन पुरवठा विभागाकडून करण्यात आले असून या सर्व लाभार्थ्यांनी आपल्या रास्त भाव धान्य दुकानदार यांचे कडील फॉर्म भरून माहिती सादर करावी व तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यास शिधापत्रिका रद्द केल्या जातील तसेच नागरीकांनी वार्षिक कौटुंबिक उत्पान्नाबाबत चुकीची अथवा खोटी माहिती दिल्यास त्यांच्या विरुद्ध कारवाई केली जाईल व आवश्यक तिथे पोलिस विभागाची मदत घेतली जाणार असल्याचे सुर्यवंशी यांनी म्हटले आहे.

# कोरावळे येथे सात दिवस हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील कोरावळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे श्री रामनवमीचे औचित्य साधून ते चैत्र पौर्णिमा म्हणजेच हनुमान जयंती पर्यंत अर्थात ६ एप्रिल ते १३ एप्रिल २०२५ पर्यंत रंगला अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा .या सात दिवसाच्या सप्ताहामध्ये प्रवचन, हरिपाठ, काकड आरती, किर्तन सेवा इत्यादी सेवेद्वारे प्रबोधन करण्यात आले. शनिवारी हनुमान जयंतीनिमित्त संपूर्ण कोरावळे गावात गेल्या छत्तीस वर्षात पालखी सोहळा निघाला नव्हता त्यापेक्षा मोठ्या उत्साहात यंदाचा पालखी सोहळा दिसून आला विशेषता या पालखी सोहळयात मोठ्या प्रमाणात महिलांनी उपस्थिती दर्शवली.

तसेच कोरावळे गावामध्ये गेली ३६ वर्ष अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होत आहे त्यामुळे या गावातील सर्व वारकरी संप्रदाय पंथातील तसेच भक्तगण मोठ्या भक्ती भावाने या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सोहळयात उपस्थित राहून श्री ज्ञानेश्वर ग्रंथराज पारायण सोहळयाचं वाचन केले,, तसेच सात दिवस विविध प्रकारची ह भ प कीर्तन महाराज यांच्याद्वारे किर्तन सेवा करण्यात आली.

तसेच रविवार १३ एप्रिल २०२५ रोजी काल्याचे कीर्तन सेवा ह.भ.प. भागवतचार्य बाळासाहेब महराज गतिर यांनी चांगले प्रबोधन करून भक्त भाविकांची मने जिंकली.या किर्तन सेवेलाचांगलाच प्रतिसाद दिला तसेच हे प्रबोधन ऐकण्यासाठी पंचक्रोशीतील भक्त भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. कोरावळे गाव पंचक्रोशीतील सर्व भक्त भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतल्याची माहिती ग्रामस्थ मंडळ कोरावळे यांनी दिली आहे. सात दिवसाच्या सप्ताहाच्या कार्यक्रमात उत्कृष्ट सूत्रसंचालन ह.भ.प. चंद्रकांत महाराज धुमाळ यांनी केले.

## मुरबाड तालुक्यात
# हनुमान जयंती उत्साहात साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व म्हसा , धसई, टोकावडे, सरळगाव, तसेच मुरबाड शहर परिसरात शनिवारी चैत्र पौर्णिमा निमित्ताने तालुक्यातील १२६ ग्रामपंचायत तसेच ५६ वाड्या-पाडयावर जय हनुमान जन्मोत्सव निमित्ताने बहुतांशी गावांमध्ये पालखी सोहळा काढण्यात आला तसेच रामनवमी ते हनुमान जयंती असा सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करून त्यामध्ये हरिपाठ, प्रवचन, व कीर्तन सेवा द्वारे प्रबोधन करण्यात आले तर रविवारी सकाळी ९ ते १२ या दरम्यान काल्याचे किर्तन सेवा करण्यात आली त्यानंतर प्रत्येक गावामध्ये दहीहंडीचे कार्यक्रम करून सर्व भक्तांनी- भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला

हनुमान जयंती निमित्ताने विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमा द्वारे विविध ठिकाणी प्रबोधन करण्यात आले.



# भिवंडी तहसिलदार कार्यालयामार्फत 'राज्यमाता-गोमाता गॅलरी' नाविण्यपूर्ण उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : देशी गायींचे भारतीय संस्कृतीत वैदिक काळापासून असलेले स्थान, देशी गायींच्या दुधाची मानवी आहारातील उपयुक्तता, आयुर्वेद चिकित्सा पद्धती, पंचगव्य उपचार पद्धती तसेच देशी गायींच्या शेण व गोमुत्राचे सेंद्रिय शेती पद्धतीत असलेले महत्त्वाचे स्थान विचारात घेवून देशी गायींना यापुढे राज्यमाता गोमाता म्हणून दि.३०/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषणा करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने नाविण्यपूर्ण उपक्रम म्हणून भिवंडी तहसिलदार कार्यालय व क्षेत्रातील कार्यरत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "राज्यमाता गोमाता गॅलरी" ही संकल्पना पथदर्शी उपक्रम म्हणून राबविण्यात येत आहे. ही गॅलरी दि.१२ एप्रिल ते ०४ मे २०२५ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत दत्त ड्रॅक्सच्या बाजूला, मुंबई-नाशिक हायवे, डोहळे गांव, ता.भिवंडी, जि.ठाणे येथे कार्यरत असणार आहे.

या गॅलरीद्वारे वरील विषयाबाबत माहितीपुस्तिका, फलक, चित्रफिती व स्वयंसेवक यांच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न आहे. तसेच निवडक संस्थांनी देशी गायीच्या शेण व गोमुत्रापासून बनविलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्याचे प्रयोजन आहे.

तरी अधिकाधिक नागरिकांनी "राज्यमाता गोमाता गॅलरी" ला भेट द्यावी, असे आवाहन भिवंडी तहसिलदार अभिजीत खोले यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात २३११ कोटी गुंतवणूकीचे सामंजस्य करार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्ह्यातील उद्योजकां सोबत दरमहा जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केले. जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद -2025 कार्यक्रमात रायगड जिल्ह्यात एकूण रु. 2311 कोटी गुंतवणूकीचे सामंजस्य करार झालेले असून यातून एकूण 2865 इतकी रोजगार निर्मिती होणार आहे.



**उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी जिल्ह्यातील उद्योजकां सोबत जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केले.**

**२८६५ रोजगार निर्मिती होणार**

महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीच्या संधी, राज्यातील उत्पादने यांची निर्यातवृध्दी तसेच औद्योगिक विकासाकरीता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाकडून जिल्हा गुंतवणूक परिषद 2025 चे आयोजन जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, -अलिबाग येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

या परिषदेकरिता उद्योग सह संचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ,प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा श्रीमती. मोरे, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, श्री. जी. एस. हरळय्या, स्टेट बँक ऑफ इंडिया विभागीय व्यवस्थापक श्री. विलास शिंदे तसेच जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनेच्या अध्यक्षासह सुमारे 250 पेक्षा अधिक उद्योजक उपस्थित होते.


जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व सामंजस्य करार धारकांना पुढील गुंतवणूक कालावधीत शासकीय सर्व कामे प्राधान्याने करण्यात येवून पुढील कालावधीत जास्तीत जास्त रायगड जिल्ह्यात रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल असे सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात रायगड -जिल्ह्याने प्रथमच 100% उद्दीष्टपूर्ण केल्याने जिल्हा उद्योग केंद्र व सर्व बँकांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले.

रायगड जिल्ह्यातील आस्तित्वातील सर्व उद्योजकांचे 100 दिवशीय कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा उद्योग मित्र समितीच्या अनुषंगाने समस्या विषयी चर्चा करण्यात आली.

उद्योग सह संचालक, कोकण विभाग,श्रीमती विजू शिरसाठ यांनी जिल्हा गुंतवणूक परिषदेचे उद्देश व एंकदरीत कोकण विभागातील औद्योगिक विकास व विस्तार याबाबत नमूद करुन मुख्यमंत्री रोजागार निर्मिती कार्यक्रम सारख्या - शासनाच्या महत्वकांक्षी कार्यक्रमात रायगड जिल्ह्याने 100% पेक्षा जास्त उद्दीष्ट यावर्षी साध्य केल्याबद्दल सर्वाचे अभिनंदन केले. उद्योग विभागाने मैत्री 2.0 सारखे अत्याधुनिक पोर्टल मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते सुरु केल्याने नविन गुंतवणूकदारांना एक खिडकी सुविधा प्राप्त झालेले आहे. सामंजस्य करारातील काही उद्योजकांना जिल्हाधिकारी, रायगड यांच्या हस्ते सामंजस्य कराराचे वाटप करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत 100% उद्दीष्ट पूर्ण केलेल्या बँकाचे प्रशस्ती पत्रक देवून यावेळी गौरविण्यात आले.

जिल्हा गुंतवणूक परिषदेस एमआयडीसी, नगर रचना विभाग, न्यू इंडिया इन्शुरन्स, मैत्री, इंडियन पोस्ट या विभागाचे सादरीकरण करण्यात आले. सदर जिल्हा स्तरीय गुंतवणूक परिषदेकरिता रायगड जिल्ह्यातील एकूण 225 पेक्षा अधिक उद्योजकासह जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनाचा सहभाग होता.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, जी. एस. हरळय्या यांनी जिल्ह्यातील उद्योगांच्या विकासा करिता जिल्हाधिकारी यांच्या सुक्ष्म नियोजन व सक्रिय सहभाग असल्याने उद्योगाचा विकास प्राधान्याने होत असल्याचे नमूद करुन विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनाने आजची गुंतवणूक परिषदेचे आयोजन केल्याचे नमूद केले.




# 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त महिला मेळावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दि.४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत संपूर्ण राज्यात "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

त्यानुषंगाने "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" कार्यक्रमाअंतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे व सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, ठाणे या कार्यालयामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती होण्यासाठी आज सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, कळवा (प.), जि.ठाणे येथील सभागृहात "महिला मेळावा" संपन्न झाला.

या कार्यक्रमास सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे, विशेष अधिकारी (शानिशा) गणेश पवार, डॉ.ममता जवादे-सोनाने, कार्यालय अधिक्षक वर्षा बिलये, वरिष्ठ निरिक्षक मीरा आगळे तसेच समाज कल्याण कार्यालयातील व अधिनस्त शासकीय वसतिगृहातील कर्मचारी यांच्याबरोबर स्थानीक महिला उपस्थित होत्या.

या मेळाव्यामध्ये उपस्थित मान्यवरांकडून तसेच बार्टीच्या समतादूत रेश्मा साळवे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याबाबत तसेच संविधनामधील महिलांसाठी असलेल्या तरतुदीबाबत उपस्थित महिलांना माहिती दिली. याचबरोबर या मेळाव्यामध्ये उपस्थितांमधून डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्यावरील गौरवगीतांचे सादरीकरण करण्यात आले. या मेळाव्याची सांगता भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे समूह वाचन करुन व या मेळाव्याचे अध्यक्ष सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाली.

या मेळाव्यास उपस्थित असलेल्या महिलांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याची माहिती मिळाल्याने कार्यक्रमाचे आयोजक सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे तसेच महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले. या मेळाव्याचे सूत्रसंचालन बार्टीच्या प्रकल्प अधिकारी मेघा पवार यांनी केले.

# भारतीय इतिहास आणि संस्कृती यांचे दर्शन घडवणारा ज्ञानकुल संस्थेचा 'ज्ञानोत्सव' संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शालेय अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, विविध कला आणि साहित्य यांचे शिक्षण देणाऱ्या ज्ञानकुल संस्थेचा तीन दिवशीय ज्ञानोत्सव चेंबूरमधील बाल विकास संघ येथे १० ते १२ एप्रिल या कालावधीत पार पडला. 'अखंड भारत' या संकल्पनेच्या अंतर्गत एकात्मता स्तोत्रावर आधारित या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले प्रकल्प मांडण्यात आले होते ज्याची माहितीही विद्यार्थी उत्साहाने देत होते. या प्रदर्शनातून अखंड भारतातील विविध उपखंडांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसाचे दर्शन घडवण्यात आले. भारताच्या इतिहासातील उल्लेखनीय घटनांचे चित्रणही या प्रदर्शनातून करण्यात आले होते. भारतातील राजे-महाराजे, साधू-संत, क्रांतिकारक, वीरांगना, प्राचीन ग्रंथ साहित्य यांविषयीची सचित्र माहिती याठिकाणी मांडण्यात आली होती. पुरातन चलने, नाणी, शिवकालीन अस्त्र-शस्त्र प्रदर्शनात मांडण्यात आले होते. अखंड भारतातील प्रसिद्ध नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे, शक्तिपीठे, ऐतिहासिक कला आणि साहित्य यांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी तयार केले होते ज्याला तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली होती. ऐतिहासिक ज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेली कोडी प्रदर्शन पाहणाऱ्यांचे कुतूहल वाढवत होती. यावेळी ज्ञानकुलच्या विद्यार्थ्यांनी लाठीकाठीची प्रात्यक्षिके, भजने आणि शौर्यगीते सादर केली. बिल्लाबोंग इंटरनॅशनल शाळेचे चेअरमन श्री. सुधीर गोयंका, आर्यन एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. आमोद उसापकर, चेंबूरचे प्रसिद्ध सी.ए. तेगचंद गुप्ता आणि भारत विकास परिषदचे प्रचारक श्री. क्षितिज गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उदघाटन पार पडले दूरदर्शनवर गाजलेल्या 'महाभारत' मालिकेतील भीष्म पितामह यांची अजरामर भूमिका साकारणारे अभिनेते मुकेश खन्ना आणि इंडियन एक्सप्रेस आणि माय उडान ट्रस्टच्या संचालिका अनन्या गोयंका यांनी या प्रदर्शनाला आवर्जून उपस्थिती नोंदवली. अन्य शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक, इतिहासप्रेमी, संशोधन प्रेमी तसेच शेकडो नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.



# हिंदूमध्ये शौर्य व सामर्थ्य वाढावे यासाठी गदापूजन

## रायगडात २४ ठिकाणी गदा पूजन

**- डॉ. उदय धुरी**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : अयोध्येत स्थापन झालेले श्रीराममंदिर ही एकप्रकारे रामराज्याची सुरुवात असून आता रामराज्य सर्वत्र स्थापन व्हावे आणि हिंदू समाजातील शौर्य जागृत होण्यासाठी आज श्री हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने हिंदु जनजागृती समिती आणि समविचारी हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि भाविक यांच्या सहभागाने देशभरात ५०० ठिकाणी सामूहिक 'गदापूजन' करण्यात आले. रायगड जिल्ह्यातही २४ ठिकाणी सामूहिक गदापूजनाचा कार्यक्रम घेण्यात आले. रायगड जिल्ह्यात पनवेल, खोपोली, अलिबाग, नागोठणे, पाली या ठिकाणी हे कार्यक्रम संपन्न झाले. यात विशेषतः युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.




या कार्यक्रमांची सुरुवात शंखनादाने झाली. त्यानंतर सामूहिक प्रार्थना, 'गदापूजन' विधी, श्री हनुमानाची आरती, मारुती स्तोत्रपठण केल्यानंतर 'श्री हनुमते नमः' हा सामूहिक नामजप करण्यात आला. या वेळी 'रामराज्याच्या स्थापनेसाठी मारुतीरायांचे गुण कसे आत्मसात करावेत' याविषयी मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी 'रामराज्याच्या स्थापनेसाठी सामूहिक प्रतिज्ञा' घेण्यात आली. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने देशभरात गेली ३ वर्ष सामूहिक 'गदापूजन' कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात येत आहेत आणि यावर्षीही हिंदुत्वनिष्ठ आणि भाविक यांचा उत्तम सहभाग यात दिसून आला.

या 'गदापूजना'मागील भूमिका स्पष्ट करताना हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता डॉ. उदय धुरी म्हणाले, मारुतीरायांची 'गदा' हे केवळ युद्धातील अस्त्र नव्हे, तर ती धर्मरक्षणाचा संकल्प, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि भगवंताच्या कार्यासाठी अहर्निश झटण्याचे प्रतिक आहे. आज अयोध्येत श्रीरामलल्ला विराजमान झाले आहेत, हा एक ऐतिहासिक क्षण आहे, पण श्रीरामाचे कार्य अजून अपूर्ण आहे. मंदिर उभारले, आता रामराज्य घडवण्याचे दायित्व आपल्या सर्वांवर आहे. हे कार्य हनुमानासारखे शौर्य, निष्ठा, त्याग आणि सामर्थ्य यांच्याशिवाय शक्य नाही. म्हणूनच या वर्षीही देशभरात गदापूजनाच्या माध्यमातून हिंदूंमधील शौर्य जागृत करण्याचा आणि रामराज्याच्या दिशेने सामूहिक वाटचाल करण्याचा निर्धार करायचा आहे'.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024